जिल्हाभरात पावसाची रिपरिप, दुबार पेरणीचे संकट टळले

जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाची रिपरिप सुरू आहे. यादरम्यान काही ठिकाणी चांगला पाऊस झाला तर अन्य ठिकाणी तुरळक पाऊस झाला. यंदा मे महिन्यात अवकाळीने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. फळ बागायतदारांचे तर अक्षरश: कंबरडे मोडले. हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेला. त्यातच पावसाळा उशिरा सुरू झाल्याने पेरण्या खोळंबल्या. सद्यस्थितीत जून महिना संपत आला असला तरी अनेक ठिकाणी चांगल्या पावसाअभावी पेरण्या रखडल्या आहेत. तर काही ठिकाणी कमी-अधीक पावसावर समाधान मानत पेरण्या पूर्ण केल्या. गेल्या दोन दिवसांपासून मात्र जिल्हाभरात पावसाने चांगली हजेरी लावली असून हा पाऊस पेरणी लायक असल्याने व दुबार पेरणीचे संकट टळल्याने शेतकरी राजा समाधानी झाल्याचे चित्र दिसत आहेत. आमच्या जिल्हाभरातील प्रतिनिधींनी पाठवलेला हा पावसाचा वृत्तांत...

धरणगाव तालुक्यात पावसाला सुरुवात,बळीराजा सुखावला

धरणगाव । प्रतिनिधी

गेल्या दोन दिवसांपासून तालुक्यातील ८६ खेड्यातील ग्रामीण शिवारात पावसाने वादळ वाऱ्यासह विजेचा कडकडाट जोरदार सुरुवात झाली. परीणामी खरीप पेरणी व लागवडीस जोरदार प्रारंभ झाला असून बहुतांश पेरण्या झाल्या आहेत. शेतकरी सुखावला आहे. मृग नक्षत्रात झालेल्या पेरणी व लागवडी मुळे पीकं डोलत आहेत. मृग नक्षत्रातील पेरणीचा उगवण शक्तीपासुन उपन्नात भरमसाठ वाढ होण्याचे भाकीत केले जात आहे. भविष्यात चांगले उपन्न येईल या अनुशंघाने बळीराजा जोरदार कामात गुंतलेला दिसून येत आहे.

गेल्या आठवड़्यात वादळामुळे खूप मोठी हानी झाली. परीसरातील अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले असले तरी वेळेवर पेरणीस सुरुवात झाल्याने समाधानाचे चित्र देखील निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या पहिल्याच वादळी पावसाने एकीकडे केळी ऊस बागायतदारांची दाणादाण उडविली आहे. तर दुसरीकडे कापूस, मका, उडीद, मूग आदी पिकांच्या लागवडीसाठी अधीर होत पावसाची वाट पाहणाऱ्या कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी हा पाऊस लाभदायक ठरला आहे. महिनाभर अवकाळी पाऊस व वादळ झाले. पावसाच्या वादळी सलामीने केळी बागांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकरी अवकाळीतून वाचले पण मृगाच्या मृगजळात फसले आहेत.

वादळाने घातलेल्या थैमानात तालुक्यातील पाळधी, रिंगणगाव, खर्ची, रंवजे धरणगाव एरंडोल रस्त्यावरील बांबोरी टोळी सह गिरणा काठा लगतच्या शिवारात शेतातील उभ्या पिकांना फटका बसला आहे. यात प्रामुख्याने केळी बागांचे नुकसान झाले आहे. निसवणीला आलेल्या व केळी घड पक्व होत असलेल्या बागात एक हजार केळी खोडामागे दोनशे तीनशे केळी खांब वादळाने वाकले आहेत. ज्या ठिकाणी चक्राकार वादळ होते. त्या ठिकाणच्या केळीबागा भुईसपाट झाल्या आहेत. गिरणा काठालगतच्या वरील गावातून केळी बागांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी होत आहे. उभा व वाढलेला ऊसदेखील लोळला आहे. या भागातील अनेक गांवातील वीज उपकेंद्रांतर्गत वीज खांब वाकल्याने व तारा तुटल्याने १५ गावांतील तब्बल १२ ते १५ तास वीजपुरवठा खंडित होता. अनेक ठिकाणी वृक्ष देखील उन्मळून पडले होते.रहदारीला मोठा अडथळा निर्माण झाला. अचानक झालेल्या वादळा मुळे रस्त्याचा कडेला असलेली झाडे उन्मळून पडली.

कोरडवाहु खरीप पेरणी शेतकरी वर्गात समाधानाचे चित्र दिसून येत होतं. पंधरा जुन पासुन जिल्ह्यात पावसाची दमदार सुरुवात झाली असल्याने दोन दिवसांपासून खरीप पेरणीस जोरदार प्रारंभ झाला असून समाधानाचे चित्र उमटु लागले आहेत. सध्या तालुक्यातील ५६७४० हेक्टर जमिन पेरणीयुक्त असल्याने तेथे खरीप हंगामातील पेरणी व लागवड केली जाते. तालुक्यातील बहुतांश भागात मका कापुस ज्वारी बाजरी उडीद मुग तुरचे उपन्न घेतले जाते. ह्या वर्षी कापुस लागवड कमी प्रमाणात दिसून येत असून शेतकरी मका लागवड अधिक प्रमाणात करत असल्याचे चित्र दिसत आहे.

भुसावळ तालुक्यात समाधानकारक पाऊस

भुसावळ । प्रतिनिधी

तालुक्यात यावर्षी समाधानकारक पावसाची नोंद झाली असून आतापर्यंत जवळपास ७० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत.

तालुक्यातील तळवेल, किन्ही, वराडसीम, वरणगाव, कठोरा, फुलगाव, सुनसगाव आदी परिसरात पावसाच्या जोरदार सरी बरसल्याने शेतकऱ्यांनी कापूस, ज्वारी, सोयाबीन, मूग, उडीद आदी पिकांची पेरणी जलद गतीने पूर्ण केली आहे. पावसाने वेळेवर हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे. अनेक ठिकाणी नांगरणी आणि मशागतीनंतर शेतीत चैतन्य दिसून येत आहे. काही भागात अजूनही पेरण्या सुरू असून येत्या काही दिवसांत शंभर टक्के पेरणी पूर्ण होण्याची शक्यता आहे.

परिसरातील नद्या नाले दुथडी भरून वाहू लागले, हतनूर जलाशयात वाढले पाणी तालुक्यात झालेल्या जोरदार पावसामुळे तापी, वाघूर, भोगावती आदी नद्या वाहू लागल्या आहेत. परिसरातील छोटे-मोठे नालेही भरून वाहत असून काही ठिकाणी छोट्या पूलावरून पाणी वाहण्याची स्थिती निर्माण झाली आहे. या पावसामुळे हतनूर धरणातही पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. जळगाव जिल्ह्यासाठी अत्यंत महत्वाच्या असलेल्या या जलाशयात पाण्याची टक्केवारी वाढत असून भविष्यातील सिंचन आणि पिण्याच्या पाण्याच्या गरजा भागण्यासाठी आश्वासक स्थिती निर्माण झाली आहे. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

पारोळा तालुक्यात पेरणी पूर्ण, अतिवृष्टीची भीती

पारोळा । प्रतिनिधी

तालुक्यामधील शेतकरी सध्या मोठ्या संकटात सापडलेला आहे, विहिरींना पाणी असलेल्या शेतकऱ्यांनी मे अखेर कापूस लावणी करून टाकली होती. मात्र पावसाने बरेच दिवस पाठ फिरवल्यामुळे शेतकरी चिंतेत होता तर गेल्या दोन-तीन दिवसापासून पाऊस असल्यामुळे पिकांना जीवदान मिळाले तर काहींनी पेरणी उशिरा केली अशा शेतकऱ्यांना आपले बियाणे वाया जाण्याची भीती निर्माण झालेली होती.

आता पारोळा तालुक्यात सतत मुसळधार जोरात पडणारा पाऊसा मुळे कोवळे पिके हे जास्त पाण्यामुळे खराब होण्याची भीती निर्माण झालेली आहे.

में महीन्यात अवकाळी पावसामुळे बरेच शेतीचे कामे रखडली होती. आता जून महीन्यात मृग नक्षत्र सुरु झाला असून सर्व शेतकरी बांधव शेतीच्या मशागतीच्या कामात व्यस्त आहेत. दि.२६ रोजी दुपारी दीड वाजेपासून मुसळधार व कमी अधिक पाऊस सुरू झाला तो रात्री उशिरापर्यंत सुरूच होता जास्त पावसामुळे ही पिके खराब होऊ शकतात त्यामुळे दुबार पेरणीचे संकट येऊ शकते. कारण पाच जुलै पर्यंत हवामान खात्याने अतिवृष्टी होणार असल्याचे संकेत दिल्यामुळे पिकांचे नुकसान होऊ शकते नाहीतर आजची परिस्थिती शेतकऱ्यांसाठी उत्तम आहे.

बहुतेक शेतकऱ्यांनी मका, कपाशी, ज्वारी, बाजरी, उडीद, मुंग, चवळी, तुर, तीळ, सोयाबीन अशी पिके तालुक्यातील शेतकरी घेत असतात परंतु गेल्या दोन तीन हंगामामध्ये उडीद मुंग चवळीचा पेरा केलेला आहे. कृषी केंद्रावर विविध खते युरिया, कीटक नाशके घेण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी दिसून येत आहे. मजूर वर्ग मिळत नसल्याने शेतकऱ्यांना फारच भटकंती करावी लागत आहे. मात्र दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

नगरदेवळा परिसरात दमदार पावसाची प्रतिक्षा

नगरदेवळा, ता.पाचोरा ।वार्ताहर

पावसाने मध्यंतरी दडी मारल्याने शेतकऱ्यांनी शेती मशागतीची कामे पूर्ण केली. जून महिन्यात सुरुवातीला पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी पेरणी सुध्दा पूर्ण केली दरवर्षीच्या प्रमाणात या वर्षी कपाशी पेरा घटला असून मका लावणी कडे शेतकऱ्यांचा जास्त प्रमाणात कल दिसून येत असून त्यांच्या खालोखाल सोयाबीन, ज्वारी, कडधान्याची पेरणी शेतकऱ्यांनी काही अंशी कां होईना करत नगरदेवळा व परीसरात ७५-८० टक्के पेरणी झाल्याचे शेतकऱ्या तर्फे बोलले जात आहे. पेरणी झाल्यानंतर पाऊस थांबल्याने पिकांची परीस्थिती उन वाऱ्यामुळे नाजूक झाली होती,तसेच वन्य प्राण्यां कडून होणारी पिकांची नासाडी व पिकांची होणारी वाढ थांबल्याने शेतकरी हवालदिल झाला होता, परंतु दि.२५ जून पासून परत पाऊस सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत असून दमदार पावसाची प्रतिक्षा शेतकरी करत आहेत.

यावल तालुक्यात पावसाची उशिराने हजेरी

यावल । प्रतिनिधी

तालुक्यात पावसाने खऱ्या अर्थाने दडी मारलेली असून आतापर्यंत फक्त तीस मिलिमीटर पाऊसयावलतालुक्यातनोंदझालेली आहे. त्यात काही शेतकऱ्यांनी ज्यांच्याकडे पाणी उपलब्ध आहे त्यांनी ठिबकद्वारा कापूस मका तुर अशा पिकांची लागवड केलेली आहे तर ज्यांच्याकडे निसर्गाच्या पाण्यावर शेती उपलब्ध आहेत त्यांनी आकाशाकडे आजपर्यंत पाहिले त्यातही काही मोठ्या शेतकऱ्यांनी कोरड्या तच उडीद मूग ज्वारी तुर पेरणी के ली आहे तर दि.२६ जून रोजी बऱ्यापैकी पाऊस झाला त्यामुळे शेतकरी आनंदित झालेले आहेत.

या पावसामुळे उर्वरित राहिलेल्या सर्व पेरण्या आता शेतकरी करून टाकतील असेही शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले यावर्षी मका ज्वारी तूर या पिकाकडे जास्त शेतकऱ्यांचा कल दिसतो कापसाकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे कापूस लागवडी पासून तर वेचणी पावेतो शेतकऱ्यांना भरपूर खर्च करावा लागतो मात्र कापसाला भावना मिळाल्यामुळे शेतकरी नाराज झालेले असून त्यांनी कापसापेक्षा मका ज्वारी तुर उडीद मूग आणि सोयाबीनकडे शेतकरी वडलेला दिसतो. शेतकऱ्यांना रासायनिक खतांपेक्षा जैविक खते वापरा असे सांगण्यात येते तर युरिया व डीएपी खत उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांची तारांबळ उडत आहे आमदार अमोल हरिभाऊ जावळे यांनी शासनाकडे जळगाव जिल्ह्यात डीएपी व युरिया त्वरित उपलब्ध करून द्या अशी मागणी केलेली आहे मात्र आता शासन नेमकी किती रासायनिक खतांचा पुरवठा करते याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे

पाचोरा तालुक्यात रिमझिम पावसात ९० टक्के पेरण्या पूर्ण

पाचोरा । प्रतिनिधी

पाचोरा तालुक्यात गेल्या मे महिन्यात मान्सुनपुर्व पावसाने जोरदार हजेरी लावली होती परंतु या जून महिन्यात अजुनही समाधान कारक पाऊस नाही, ११ जून रोजी झालेल्या वादळीवाऱ्यासह पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. अधूनमधून रिमझिम पाऊस सुरू असल्याने पाचोरा तालुक्यातील जवळपास ९०टक्के शेतकऱ्यांनी शेताची मशागत करून पेरण्या केल्या आहेत.

कारण पेरणी उशिरा झाली की उत्पादन कमी येते आणि रब्बी हंगामातील पिके घेण्यास ही उशीर होतो. तसेच बरड व हलक्या जमिनीत पेरण्या पूर्ण झाल्या नाहीत, शेतकरी चांगल्या पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत. २५ जून पासून पाचोरा तालुक्यात पावसाने पुन्हा हजेरी लावल्याने शेतकरी वर्गाला दिलासा मिळाला असला तरी जोडीदार पावसाची गरज आहे. आजच्या स्थितीत पिकांची स्थिती साधारण असुन चांगला पाऊस झाला तर पिकांची स्थिती सुधारणार आहे.

शेतकऱ्याचा या हंगामात मका व कापूस लागवडी कडे कल दिसून येत असला तरी कापूस पिकांपेक्षा मका पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. काही भागात थोड्याफार प्रमाणात सोयाबीन व इतर पिकांच्या पेरण्या झाल्या आहेत. एकंदरीत रिमझिम पावसाने का होईना शेतशिवारात हिरवळ दिसून येत आहे.

चाळीसगाव तालुक्यात ६० टक्के पेरण्या पूर्ण

चाळीसगाव। प्रतिनिधी

चाळीसगाव तालुक्यात अवकाळी पावसानतंर बऱ्याच शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत, तर ७ जून नतंर सुरु झालेल्या रिमझिम पावसानतंर जवळपास ५० ते ६० टक्के शेतकऱ्यांनी पेरण्या पूर्ण केल्या आहेत. परंतू तालुक्यात दमदार पाऊस नसल्याने शेतीचे चक्र कोलमडून गेले असून शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतिक्षा आहे.

तालुक्यात जवळपास ५० ते ६० टक्के पेरणी झाल्या आहेत. सर्वसाधारण पेरणी क्षेत्र ८६.९९४ हेक्टर क्षेत्रापैकी आजपावेतो ५० ते ६० हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. त्यातही बागायत आणि कोरडवाहू अशा ४२ हजार हेक्टर क्षेत्रावर कापसाची लागवड झाल्याचा अंदाज कृषी विभागाने बर्तविला आहे. दमदार पाऊस नसल्याने कोरडवाहू क्षेत्रातील जवळपास ३० ते ४० टाक्के पैरण्या खोळंबल्या आहेत. धूळ पेरणी केलेल्या शेतकऱ्यांची दमदार पावसाअभावी चिंता वाढली आहे.

चाळीसगाव तालुक्यात खरीप हंगामाची लगबग सुरू आहे. यंदा पावसाळा मोठ्या प्रमाणावर होवून आबादानी असेल असे सांगितले जात होते. मे महिन्यात अवकाळी पावसाने झोडपून काढले, त्यात रब्बी हंगामाला मोठा फटका बसला. कसाबसा रब्बी हंगाम आवरता घेत शेतकरी खरीप हंगामाकडे वळला मात्र जून महिन्यात पावसाने अकरका हुलकावणी दिली, परंतू आज बुधवारपासून दमदार पावसलास सुरुवात झाली आहे. गुरुवारी दुपारपासून देखील तालुक्यात रिमीझिम पाऊस सुरु झाला तो रात्री उशिपर्यत सुरुच होता.

तालुका कृषी विभागाच्या माहीतीनुसार चाळीसगाव तालुक्यात सर्वसाधारण पेरणी क्षेत्र ८६.९९४ हेक्टर क्षेत्रापैकी २६ जून अखेर एकूण ५० हजार ८६२ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. त्यात बुधवार व आज गुरुवार या दोन दिवसात पेरणीचे क्षेत्र वाढले. तालुक्यात ६२ हजार ६५१ हेक्टर क्षेत्र है कापूस लागवडीखाली असून त्यापैकी ४१ हजार ८६० हेक्टर क्षेत्रावर कापूस लागवड सोमवारपर्यंत झालेली होती. बागायती कापसाची लागवड १०० टक्के झाल्याचा अंदाज कृषी विभागाने वर्तविला असून केवळ कोरडवाहू कपाशी लागवड दमदार पावसाअभावी थांबली आहे. २६ जून अखेर ज्वारी १६ हेक्टर, बाजरी १८ हेक्टर, मका ९१८ हेक्टर, तूर १८ हेक्टर, मूह-उड़ीद २० हेक्टर अशी एकूण ४२ हजार ८५२ हेक्टरवर पेरणी झाली, पेरणीची ही टक्केवारी ४९.२७ टक्के इतकी होती. मंगळवार आणि आज बुधवार या दोन दिवसात आणखी १० टक्के पेरणी होवून आतापर्यंत जवळपास ५९ टक्के पेरणी तालुक्यात झाल्याचा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे पुरेसाहस नसल्याने अजूनही कोरडवाहू क्षेत्रात खोळंबल्या आहेत. तर केवळ ६२ मिमी इतकाच पाऊस झाला असून तो गतवर्षपिशा निम्म्याने कमी आहे.

चोपडा तालुक्यात ९० टक्के पेरण्या पूर्ण; दोन दिवसांपासून पावसाची रिपरिप

चोपडा । प्रतिनिधी

चोपडा तालुक्यात यंदा रोहिणी नक्षत्र आणि मृग नक्षत्रात झालेल्या समाधानकारक पाऊस झाल्याने यंदा खरीपाच्या पेरण्या ९० टक्के पूर्ण झाल्या आहेत.

विशेष म्हणजे यंदा पावसाळ्याला लवकर सुरुवात होऊन रोहिणी व मृग नक्षत्रात जोरदार वादळासह मुसळधार पाऊस झाला. त्या नंतर दोनचार दिवसाच्या अंतराने अधून मधून पाऊस पडत आहे.सुरुवाती पासूनच तालुक्यात चांगला पाऊस पडत असल्याने दुबार पेरणीची गरज भासली नाही. तसेच गेल्या दोन दिवसां पासून पावसाळी वातावरण असून, दिवसभरासह रात्री पावसाची रिपरिप सुरू आहे. परंतु खरीप पिकांसाठी पावसाची नितांत गरज आहे.

सध्या पिकांची कोळपणी, खते देणे आणि निंदणीची कामे सुरू आहेत. चोपडा तालुक्यात गुरुवारी सकाळी ८ वाजेपर्यंत ९१.३४ मिलीमीटर पावसा ची नोंद करण्यात आली आहे. गेल्या २०२४ वर्षा पेक्षा यंदा पावसाची दमदार सुरुवात झाली आहे. मे महिन्याच्या अखेरीस म्हणजे रोहिणी नक्षत्रात जोरदार वादळासह मुसळधार पाऊस झाला.त्यानंतर मृग नक्षत्रात देखील दोनदा वादळासह मुसळधार पावसासह प्रचंड विजांचा गडगडाट बघायला मिळाला.

जोरदार वादळामुळे वीज पुरवठा खंडित होऊन लहान मोठी झाडे उन्मळून पडली. वादळामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते.सुरुवाती पासून तालुक्यात समाधानकारक पाऊस होत असल्याने यंदा खरीप हंगामात ९० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. यंदा लग्नसराईची धामधूम आणि कडक न्हाळ्यामुळे यंदा शेतकऱ्यांना शेतीच्या मशागतीची कामे पूर्ण करता आली नाही त्यात वेळेवर पावसाळ्याला वेळेवर सुरुवात झाल्याने मशागतीसाठी शेतकऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. यंदा मृग नक्षत्राने दमदार हजेरी लावल्याने खरीप हंगाम चांगला येईल असा शेतकऱ्यांचा अंदाज आहे.जास्त नाही पण समाधानकारक पाऊस झाल्याने वेळेवर खरिपाच्या पेरण्यांना सुरुवात झाली. चोपडा तालुक्यात आजपर्यंत ९० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत.

यावल नगरपरिषद, यावल जि. जळगाव
YAWAL MUNICIPAL COUNCIL
YAWAL, DIST.JALGAON
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
दूरध्वनी क्रमांक:-०२५८५ २६१२३७ E-Mail ID :- coyawalgmail.com
जा.क्र./यानप/आवि./१६७५/२०२५ दिनांक : २६/०६/२०२५

ई-निविदा सूचना (द्वितीय वेळ)

मुख्याधिकारी, यावल नगरपरिषद, जि.जळगाव यांच्याकडे खालील विवरणात नमूद केलेल्या आरोग्य विभागाकरिता ''मा.आमदार निधी अंतर्गत यावल नगरपरिषदकरिता रुग्णवाहिका खरेदी करणे (Type B non-ac Ambulance - Bolero Neo Plus D4 Ambulance BS-IV or equivalent model) या निविदासाठी ऑनलाईन ई-निविदा योग्य पंजीबद्ध कंत्राटदार, विक्रेता, पुरवठादार, सेवा सहकारी संस्था, सेवाभावी संस्था यांचेकडून द्वि-लिफाफा पद्धतीने सीलबंद लिफाफ्यात http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा दिनांक २७/०६/२०२५ ते दिनांक ०४/०७/२०२५ पर्यंत आमंत्रित करण्यात येत आहे.

सही/-
(शिक्का)
(निशिकांत गवई)
मुख्याधिकारी
यावल नगरपरिषद, यावल

अमळनेर तालुक्यात पिके कोमेजली, रिमझिम पावसाने आशा पल्लवित, दमदार पावसाची प्रतीक्षा

अमळनेर । प्रतिनिधी

तालुक्यात जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या पावसामुळे शेतकरी बांधवानी कापूस, मका, लागवड तर ज्वारी, बाजरी, सोयाबीन, मूग, उडीद आदी पिकांची पेरणी केली आहे. मात्र लागवड व पेरणी नंतर अजूनही दमदार पाऊस नसल्याने पाण्याअभावी पिके कॉमेजलेली दिसून येत आहेत.

जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या पावसाने मृग नक्षत्रात शेतकऱ्यांनी पेरणी व लागवड केली आहेत. यात तालुक्यातील अमळनेर, भरवस वावडे, मारवड, अमळगाव, पातोंडा, नगाव, शिरूड, हेडावे, टाकरखेडा मंडळात पिकांची परिस्थितीत तफावत दिसून येत आहे.

यात शिरुड मंडळात अजूनही सुरुवातीपासूनच दमदार पाऊस नसल्याने पिके पूर्णता कोमेजलेली दिसून येत आहेत. भरवस मंडळात सर्व शेतकऱ्यांनी धूळ पेरणी व लागवड केली असून पिकांची वाढ पाण्याअभावी खुंटलेली दिसून येत आहेत. मारवड मंडळात पीक परिस्थिती समाधानकारक असून कापूस, मका या पिकांची अंतर मशागत सुरु आहे. मात्र सध्यस्थितीत जोरदार पावसाची प्रतिक्षा आहे. तर नगावं मंडळातही तीच परिस्थिती असून तालुक्यात सर्वत्र पेरणी व लागवड झाली असून पावसाची प्रतीक्षा आहे.

मका, कापूस पिकाची फेर लागवड- तालुक्यात बऱ्याच शेतकऱ्यांनी धूळ पेरणी केल्याने कापूस, मका पिकांची फेर लागवड करावी लागली आहे. यात कापूस व मका पीक यांचे कोंब जमिनीतून बाहेर आल्यानंतर पाऊस नसल्याने शेत किड्यांनी उगवलेले कोवळे कोंब कुरतूडून फेकल्याने नवीन लागवड करावी लागली आहे. परिणामी महागडे बियाणे जास्तीचे लागल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका सोसावा लागला आहे. जूनमहिन्याच्या शेवटचा आठवडा असूनही या महिन्यात समाधान कारक पाऊस नसल्याने शेतकऱ्यांनी लाखो रुपयांचे महागडे बियाणे जमिनीत टाकूनही पावसाने दांडी मारल्याने शेतकरी चिंतेत पडला आहे. मात्र दि.२६ रोजी तालुक्यात सर्वत्र रिमझिम पावसाला सुरुवात झाल्याने हवेत गारवा झाला असून शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

एरंडोल तालुक्यात दुबार पेरणीचे संकट टळले

एरंडोल । प्रतिनिधी

शहर व तालुक्यात रात्री पासून पावसाने जोर धरला असून काल दिवसभर कधी जोरात तर कधी रिमझिम सर्वत्र पाऊस सुरू होता. पावसामुळे खरीप पिकांची वाढ निश्चित होणार असून खरीप हंगामाच्या पेरण्या जवळजवळ पूर्ण झालेले आहे दुबार पेरणीचे संकट टळले आहे.

मे महिन्यात पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मशागतीचे काम रखडले होते. शेत जमीन मशागतीचे काम पूर्ण झाले असून खरीप हंगामाच्या पेरण्या जवळपास ९० ते ९५ टक्के झालेल्या आहेत. कालपासून तालुक्यात सुरू असलेल्या पावसामुळे राहिलेल्या पेरण्या व मशागतीचे काम पूर्णपणे रखडलेली आहेत. याचबरोबर यावर्षी मका व कापूस सोयाबीन पिकाला शेतकऱ्यांनी जास्त प्रमाणात प्राधान्य दिल्याचे वाटत आहे. तसेच खरीप हंगामाचे पिक आज तरी चांगल्या परिस्थितीत समाधानकारक आहे. यावर्षी कापसाचा पेरा मागील वर्षापेक्षा थोडा कमी असल्याची चर्चाही शेतकरी वर्गात आहे. कडधान्याची ही लागवड चांगल्या प्रमाणात झाली. शेतकरी वर्ग पूर्णपणे शेती कडे कामाछ व्यस्त आहे. मजुर भाव खायला लागले आहेत. काल पासून सुरू झालेल्या पावसा मुळे खरीप हंगामाला निश्चित फायदा जाणवेल या पावसा मुळे पिकां सोबत जमिन ही पीक वाढीला फायदा होणार आहे शेती या पावसामुळे जमिनीमध्ये गारवा निर्माण झाला आहे तसेच कालपासून सुरू झाल्या पावसामुळे जन जीवनावर परिणाम झालेला आहे नागरिकांनी घरातच चांगले पसंत केले.

रावेर तालुक्यात दमदार पावसाची प्रतीक्षा

रावेर । प्रतिनिधी

तालुक्यात यंदा उशिराने पाऊसाने हजेरी लावली आहे.गुरुवारी सकाळपासून रिपरिप पाऊस पडत असून, ढगाळ वातावरणाने मुक्कामी पाऊस असल्याची चिन्हे आहे. यामुळे शेतकऱ्यांची रखडलेल्या पेरण्या पूर्ण करण्यासाठी लगबग सुरु आहे. रिपरिप पाऊस पडत असल्याने, अद्याप दमदार पाऊसाची प्रतीक्षा आहे.

दि.१२ जूनपासून रावेर मंडळात ८५ मिमी, खानापूर मंडळात-५२ मी.मी. ऐनपूर मंडळात ४० मिमी, खिर्डी-४४ मिमी,निंभोरा बुद्रुक-१४ मिमी, सावदा मंडळात-६६, खिरोदा प्र.यावल-३६ मिमी, पाल-९५ मिमी, केऱ्हाळे बुद्रुक-७७ मिमी, सरासरी ७८ मी.मी पाऊस पडला आहे. पाऊसचे आता आगमन झाल्याने पाऊसाची प्रतीक्षा करत असलेले शेतकरी रखडलेल्या पेरण्या पूर्ण करण्यासाठी कामाला लागले आहे.

दमदार पावसाने बळीराजा सुखावला

भडगाव । प्रतिनिधी

तालुक्यात दोन दिवसांपासून होत असलेल्या दमदार पावसाने दुबार पेरणीचे संकट टळले असुन बळीराजा सुखावला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.तालुक्यात यावर्षी कपाशी, मका, ज्वारी या पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड झाली आहे.पेरण्या झाल्यानंतर तुरळक प्रमाणात पाउस झाला मात्र गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने पिके पाण्याअभावी अभावी धोक्यात आली होती.

बळीराजा आर्थिक संकटात सापडला होता कारण दुबार पेरणीचे संकट डोळ्यासमोर येवून ठेपले होते मात्र काल पासून पावसाने दमदार हजेरी लावली असून पिकांना या पावसाने जिवदान मिळाले असले तरी पाणी अजून शेताबाहेर निघाले नसल्याने नदी -नाले कोरडे पडले आहेत बागायत क्षेत्र देखील तालुक्यात मोठ्या प्रमाणावर असून केळी पिकाची लागवड हि समाधानकारक पाऊस झाला तरच अवलंबून असते.येणा-या काळात मुसळधार पाऊस होऊन नदी -नाल्यांना पुर यावा यासाठी वरुण राजा कडे बळीराज्याकडून होतांना दिसत आहे

चौकशीसाठी जाहीर नोटीस

श्री. विजय विश्वास पवार यांस कळविण्यात येते की, आपण **परनॉड रिकार्ड इंडिया प्रा.लि. का.म्हाळुंगी, ता. दिंडोरी, जि. नाशिक** येथे कामास आहात. मात्र आपण विना अनुमती, विना रजा कामावर गैरहजर आहात. सबब आपणास **दि. २३.०४.२०२५ रोजी** व्यवस्थापनाने आरोपपत्र देऊन आपली **ॲड. गिरीश आ. वाघस्कर** यांचे समोर खातेनिहाय चौकशी नेमलेली आहे. मात्र आपणास आरोपपत्र व चौकशीची तारखा नेमलेचे पाठवलेले पत्रे आपण व्यवस्थापनास दिलेल्या पत्त्यावर पाठवली असता सदरची पत्रे **'अपुर्ण पत्ता पाठवणारास परत'** आणि **'इनसफीशंट ॲड्रेस'** या शेऱ्याने व्यवस्थापनाकडे परत आलेली आहेत. सबब आपणास सदरचे जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आपण **दि. १०.०७.२०२५ रोजी दु. १.०० वा. स्थळ ऑफीस नं. एफ.जे. ९, ठक्कर बझार, नाशिक** या ठिकाणी चौकशीसाठी हजर राहवे. आपण अनुपस्थितीत राहिलेस चौकशी अधिकारी आपले गैरहजेरीत चौकशीचे कामकाज चालवुन पुर्ण करु शकतील व त्याकामी घेण्यात आलेले सर्व निर्णय आपल्यावर बंधनकारक राहतील, याची नोंद घ्यावी. कळावे. नाशिक, दि. २७.०६.२०२५.

सही/-
परनॉड रिकार्ड इडिया प्रा.लि. करीता